0001

## नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे समोर

वाचावे :- १) या कार्यालयाचे दक्षता शाखेकडून दिनांक १९/०१/२०१३ रोजी प्राप्त झालेला अहवाल व त्यासोबतची कागदपत्रे.

२) या कार्यालयाची "कारणे दाखवा नोटीस" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.०३/२०१३/जा.६९, दिनांक २१/०१/२०१३, ०७/०२/२०१३, २५/०२/२०१३, ०६/०३/२०१३ व १३/०३/२०१३.

३) उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ यांचा दि. ०४/०२/२०१३ रोजी टपालामार्फत प्राप्त अहवाल.

४) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, एपीएमसी पोलिस ठाणे, नवी मुंबई यांचे दिनांक ०५/०२/२०१३ रोजीचे अभिवेदन.

५) मे. गौतम मार्केटींगचे मालक विशाल अमरशी गाला यांचेवतीने ॲड. पी.ए. पोळ यांचे दिनांक ०५/०२/२०१३ रोजी टपालामार्फत प्राप्त निवेदन.

६) या कार्यालयाची पत्र क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.०३/२०१३/जा.१४५, दिनांक २५/०२/२०१३

७) अन्न व औषध प्रशासन विभाग, वांद्रे, मुंबई यांचे पत्र क्र. एफटीएल/एफडीओ/०८(४)/१३ अन्वये दक्षता शाखेकडून दिनांक २५/०२/२०१३ रोजी प्राप्त प्राप्त पृथःकरण अहवाल.

८) या कार्यालयाचे "अंतरीम आदेश" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.०३/२०१३/जा.१५३,दि.२६/०२/१३

९) मे. गौतम मार्केटींगचे मालक विशाल अमरशी गाला यांचेवतीने ॲड. पी.ए. पोळ यांचे दिनांक ०४/०३/२०१३ रोजी टपालामार्फत प्राप्त निवेदन.

१०) मे. गौतम मार्केटींगचे मालक विशाल अमरशी गाला यांचेवतीने ॲड. पी.ए. पोळ यांचे दिनांक ०५/०३/२०१३ रोजीचे निवेदन.

११) मे. गौतम मार्केटींगचे मालक विशाल अमरशी गाला यांचेवतीने ॲड. पी.ए. पोळ यांचे दिनांक १२/०३/२०१३ रोजीचे निवेदन.

१२) आयुक्त, अन्न व औषध प्रशासन विभाग, बांद्रा, मुंबई यांना निर्गमित केलेले पत्र क्र. निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.०३/२०१३/जा.२०८, दि. १५/०३/२०१३.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES HEAD OFFICE MUMBAI

क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.०३/२०१३/जा. 440
नियंत्रक शिधावाटप व संचालक
नागरी पुरवठा यांचे कार्यालय,
रॉयल इशुरस इमारत, ५ वा मजला,
१४, ज.टाटा मार्ग, चर्चगेट, मुंबई - २०.
दिनांक : 17 / 04 /२०१३.

## आ दे श

(जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये)

### प्रकरणाची पार्श्वभूमी :-

दिनांक ११/०१/२०१३ रोजी मे. गौतम मार्केटिंग, प्लॉट नंबर ४२, सेक्टर-१९ अे, एपीएमसी, दानाबंदर समोर, वाशी, नवी मुंबई या कंपनीमध्ये पामतेल तसेच कमी प्रतीचे खाद्यतेल हे विविध क्षमतेच्या डब्यांमध्ये पॅकींग

करुन त्या डब्यांवर शेंगदाणा तेल, राईचे तेल, कपाशीचे तेल अशी लेबले लावून त्यामधील खाद्यतेलाचा साठा हा उच्च प्रतीचा असल्याचे भासवून ग्राहकांची फसवणूक करीत असल्याच्या या कार्यालयास मिळालेल्या खात्रीलायक खबरीनुसार या कार्यालयातील फिरत्या पथकातील अधिकारी/कर्मचारी हे पंचांसह दुपारी ४:३० वाजता अलाहाबाद बँक, सेक्टर १९-अे, वाशी, नवी मुंबई येथून शासकीय वाहनाने प्लॉट नंबर ४२, सेक्टर-१९-अे, एपीएससी, दानाबंदर समोर, वाशी, नवी मुंबई येथे पोहोचले. सदर गाळयामध्ये प्रवेश केला असता समोरच असलेल्या काऊंटरवर उपस्थित असलेल्या इसमास अधिकाऱ्यांनी स्वत:ची ओळख करुन देऊन त्याला त्याचे नांव विचारले असता, त्यांने त्याचे नांव अमित अमरशी गाला असे सांगितले. अधिकाऱ्यांनी पंचांसमक्ष त्याचे व्यवसायाबाबत विचारणा केली असता, तो मे. गौतम मार्केटींगचे मालक विशाल अमरशी गाला यांचा भाऊ असल्याचे सांगितले. अधिकाऱ्यांनी मालक केव्हा हजर होतील याबाबतची विंचारणा केली असता ते भिवंडी येथे गेलेले असून, ते एक तासात हजर होतील असे सांगितले.

तदनंतर उपस्थित इसमास अधिकाऱ्यांनी पंचांसमक्ष सदर गाळयामध्ये चालत असलेल्या व्यवसायाबाबत विचारणा केली असता, त्याने सदर गाळयामध्ये विविध प्रकारचे खाद्यतेल मे. रुची ऑईल, मे. लिबर्टी, मे. कमानी, मे. संजय सोयाबीन व मे. कृष्णा रिफायनरी इ. विविध कंपन्यांकडून लूज साठा खरेदी करुन त्याचे १ लिटर, ५ लिटर चे पाऊच/कॅन व १५ किलो पत्र्यांच्या डब्यामध्ये पॅकींग करुन विविध किरकोळ विक्रेत्यांना ते त्यांच्या गरजेनुसार विक्री करत असल्याचे अमित अमरशी गाला यांनी अधिकाऱ्यांना पंचासमक्ष सांगितले.

अधिकाऱ्यांनी पंचासमक्ष व्यवसायाकरिता साठवणूक केलेल्या खाद्यतेलाचे वरील नमूद पत्त्यावर वरील साठवणूक परवाना तसेच कंपनीस आवश्यक असणारे इतर परवान्यांबाबत विचारणा केली असता, अमित अमरशी गाला यांनी अधिकाऱ्यांना पंचासमक्ष खालील कागदपत्रांच्या छायांकित प्रती सादर केल्या.

१. दिनांक ३१.०३.२०११ रोजी निर्गमित केलेला घटनास्थळी असलेल्या नमूद पत्त्यावरील गुमास्ता परवाना क्रमांक एस/३१६४१, वैधता दिनांक २०१३.
२. दिनांक ३१.१२.२०१४ पर्यंत वैध असलेला शिधावाटप यंत्रणेकडील खाद्यतेल घाऊक परवाना क्रमांक क्र. ४१ एफ/वाशी-१०,सं.प/७८१ (घा.) पत्ता - एल ५९, अेपीएमसी मार्केट-१, फेज २, सेक्टर-१९, वाशी, नवी मुंबई या जून्या तसेच वेगळया पत्त्यावरील परवाना आढळून आला.
३. अन्न व औषध प्रशासन यांचे घटनास्थळी असलेल्या नमूद पत्त्यावरील परवाना क्रमांक S/NM/REP/६०४/COM/५०४२/२०११ वैधता दिनांक ३१.१२.२०१५.

४. कंपनीच्या जागेबाबतचे ०१.०३.२०११ ते ३०.११.२०१३ पर्यंतचे अमरजितसिंग धिल्लॉन व त्यांची पत्नी सुरजीतकौर यांचे नांवे असलेले भाडेकरारनामा.

५. कृष्णा रिफायनरी व लिबर्टी ऑईल मिलचे इनवॉइस बिल.

६. व्यवसायाच्या जागेचा पत्ता बदली करण्याकरिता फ परिमंडळ कार्यालयास सादर केलेले दिनांक २०.०४.२०११ व १७.०९.२०१२ चे अर्जाची छायांकित प्रत.

अधिकाऱ्यांनी उपस्थित इसम यांच्याकडे अधिक विचारणा केली असता, वरील नमूद बिलानुसार विविध कंपन्यांकडून खरेदी केलेला खाद्यतेलाचा साठा कंपनीच्या पेठमाळयावर असलेल्या जाड लोखंडी टाक्यांमध्ये साठवणूक करुन त्याचे १ लिटर, ५ लिटर व १५ किलोच्या क्षमतेमध्ये पॅकींग करुन किरकोळ विक्रेत्यांना विक्री करत असल्याचे सांगितले. तद्नंतर अधिकाऱ्यांनी उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे यांनी निर्गमित केलेला खाद्यतेलाच्या घाऊक परवान्यावरील घटनास्थळापासून वेगळा पत्ता असल्याची बाब निदर्शनास आणून दिली असता, सदर परवान्यावरील नमूद पत्त्याची नोंद व पत्ता बदलण्याकरिता दिनांक २०.०४.२०११ रोजी संबंधित कार्यालयात अर्ज सादर केल्याचे सांगून सदर पत्ता बदलच्या अर्जासोबत आवश्यक कागदपत्रांची पुर्तता न केल्याची बाब संबंधित कार्यालयाच्या अधिकाऱ्यांनी स्थळ भेटीच्या वेळी सांगितले. त्यामूळे जागेच्या पुराव्याबाबत मागणी केल्यानुसार कोणताही पुरावा सादर न केल्याने त्याचा अर्ज निकाली काढण्यात आल्याचे त्यास सांगण्यात आले. तद्नंतर दिनांक १७.०९.२०१२ रोजी परवान्यावरील पत्ता बदली करण्याकरिता नव्याने अर्ज केल्याचे सांगून सदर अर्जासोबतही जागेच्या पुराव्याबाबत आवश्यकतेनुसार कोणताही ठोस पुरावा सादर केला नसल्याची बाब अधिकारी व पंचासमक्ष उपस्थित इसमाने कबूल केली आहे. अधिकाऱ्यांनी जागेच्या मालकीबाबत विचारणा केली असता, सदर जागा अमरज़ितसिंग धिल्लॉन व सुरजितकौर यांच्या नांवे असल्याचे सांगून सदर जागा दिनांक ०१.०३.२०११ पासून ३०.११.२०१३ पर्यंतच्या कालावधीसाठी भाडेतत्वावर घेतल्याचे उपस्थित इसमाने अधिकाऱ्यांना पंचासमक्ष सांगितले. त्यानुसार अधिकाऱ्यांनी अमित अमरशी गाला यांचा लेखी जबाब पंचासमक्ष नोंदविण्यात आला आहे.

तद्नंतर काही कालावधीने एक व्यक्ती घटनास्थळी उपस्थित झाली. अधिकाऱ्यांनी पंचासमक्ष सदर व्यक्तीस त्याचे नाव विचारले असता, त्याने त्याचे नाव विशाल अमरशी गाला असे सांगून ते मे. गौतम मार्केटिंग, प्लॉट नंबर ४२, सेक्टर-१९ अे, अे पी एम सी, दानाबंदर समोर, वाशी, नवी मुंबई येथे चालत असलेल्या खाद्यतेलाच्या पॅकींग व घाऊक व्यवसायाचे ते मालक असल्याचे सांगीतले. अधिकाऱ्यांनी पंचासमक्ष सदर व्यक्तीस गाळयात साठवणूक करुन ठेवण्यात आलेल्या खाद्यतेल साठयाबाबत विचारणा केली असता, त्याने विविध

DIRECTOR OF CIVIL SUPPLIES ... OFFICE ... MUMBAI

कंपन्यांकडून खरेदी केलेला खाद्यतेलाचा साठा कंपनीच्या पोटमाळयावर असलेल्या जाड लोखंडी टाक्यांमध्ये साठवणूक करुन त्याचे १ लिटर, ५ लिटर व १५ किलोच्या क्षमतेमध्ये पॅकींग करुन किरकोळ विक्रेत्यांना विक्री करत असल्याचे सांगितले.

सदर खाद्यतेल कोणाकडून खरेदी केले जाते याबाबत अधिकाऱ्यांनी पंचासमक्ष विशाल अमरशी गाला यांना विचारणा केली असता, वरील नमूद बिलानुसार कृष्णा रिफायनरी व लिबर्टी ऑईल मिल या कंपन्यांकडून खरेदी केलेला खाद्यतेलाचा साठा कंपनीच्या पोटमाळयावर असलेल्या जाड लोखंडी टाक्यांमध्ये साठवणूक करुन त्याचे १ लिटर, ५ लिटर व १५ किलोच्या क्षमतेमध्ये पॅकींग करुन किरकोळ विक्रेत्यांना विक्री करत असल्याचे सांगितले. तदनंतर अधिकाऱ्यांनी उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे यांनी निर्गमित केलेला खाद्यतेलाच्या घाऊक परवान्यावरील घटनास्थळापासून वेगळा पत्ता असल्याची बाब निदर्शनास आणून दिली असता, सदर परवान्यावरील नमूद पत्याची नोंद व पत्ता बदलण्याकरिता दिनांक २०.०४.२०११ रोजी संबंधित कार्यालयात अर्ज सादर केल्याचे सांगून सदर पत्ता बदलच्या अर्जासोबत आवश्यक कागदपत्रांची पुर्तता न केल्याची बाब संबंधित कार्यालयाच्या अधिकाऱ्यांनी स्थळ भेटीच्या वेळी सांगितले. त्यामूळे जागेच्या पुराव्याबाबत मागणी केल्यानुसार कोणताही पुरावा सादर न केल्याने त्यांचा अर्ज निकाली काढण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. तद्नंतर दिनांक १७.०९.२०१२ रोजी परवान्यावरील पत्ता बदली करण्याकरिता नव्याने अर्ज केल्याचे सांगून सदर अर्जासोबतही जागेच्या पुराव्याबाबत आवश्यकतेनुसार कोणताही ठोस पुरावा सादर केला नसल्याची बाब अधिकारी व पंचांसमक्ष उपस्थित इसमाने कबूल केली आहे. अधिकाऱ्यांनी जागेच्या मालकीबाबत विचारणा केली असता, सदर जागा अमरजितसिंग धिल्लॉन व सुरजितकौर यांच्या नांवे असल्याचे सांगून सदर जागा दिनांक ०१.०३.२०११ पासून ३०.११.२०१३ पर्यंतच्या कालावधीसाठी भाडेतत्वावर घेतल्याचे उपस्थित इसमाने अधिकाऱ्यांना पंचासमक्ष सांगितले. त्यानुसार अधिकाऱ्यांनी अमित अमरशी गाला यांचा लेखी जबाब पंचासमक्ष नोंदविण्यात आला आहे. तद्नंतर अधिकाऱ्यांनी पंच व उपस्थित व्यक्ती अमित अमरशी गाला यांचे समक्ष युनीटमधील असलेल्या टाक्यांमधील तसेच विविध क्षमतेच्या खाद्यतेल साठयाचे मोजमाप/मोजदाद केले असता, ते खालील प्रमाणे आढळले.

पॅक केलेल्या डब्यामधील प्रत्यक्ष साठा मोजमाप

| अ. क्र. | खाद्यतेल ब्रॅडचे नांव | तेलाचा प्रकार | डबा संख्या | क्षमता प्रती डबा कि.ग्रॅ. | एकूण साठा कि.ग्रॅ. | लिटर्समध्ये | दर प्रति किलो | दर प्रति डबा | एकूण किंमत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ग्रेट सन | सनफ्लॉवर | ७८ | १५ | ११७० | १२८५.८ | ६२ | ९३० | ७२५४० |
| २ | राधाराईस | सनफ्लॉवर | ५१ | १५ | ७६५ | ८४०.७४ | ६४ | ९६० | ४८९६० |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ | ईगल राईस | सनफ्लॉवर | ३४२ | १५ | ५१३० | ५६३७.९ | ६४ | ९६० | ३२८३२० |
| ४ | सौराष्ट | सिंगतेल | ४२ | १५ | ६३० | ६९२.३७ | ९५ | १४३० | ५९८५० |
| ५ | पूजा | कॉटनसिड | ३५ | १५ | ५२५ | ५७६.९८ | ६६ | ९९० | ३४६५० |
| ६ | गौतम | सोयाबीन | ६ | १५ | ९० | ९८.९१ | ६८ | १०२० | ६१२० |
| ७ | प्लेन | कॉटनसिड | ४८ | १५ | ७२० | ७९१.२८ | ६६ | ९९० | ४७५२० |
| ८ | सनी | कॉटनसिड | ८८ | १५ | १३२० | १४५०.७ | ६६ | ९९० | ८७१२० |
| ९ | तीलडाप | तीळतेल | ८ | १५ | १२० | १३१.८८ | ८५ | १२८० | १०२०० |
| १० | स्वादीष्ट | कॉटनसिड | ६३ | १५ | ९४५ | १०३८.६ | ६६ | ९९० | ६२३७० |
| ११ | गुजरात | सिंगतेल | १२० | १५ | १८०० | १९७८.२ | ९५ | १४३० | १७१००० |
| १२ | लेबले नसलेले | सिंगतेल | ७३५ | १५ | ११०२५ | १२११६ | ९५ | १४३० | १०४७३७५ |
| १३ | खराब तेल | सिंगतेल | ५५१ | १५ | ८२६५ | ९०८३.२ | ९५ | १४३० | ७८५१७५ |
| १४ | सोना | सिंगतेल | ९ | ५ | ४०.९५ | ४५ | ७९ | ३६० | ३२३५.१ |
| १५ | गुजरात | सिंगतेल | ४० | ५ | १८२.०० | २०० | ७९ | ३६० | १४३७८ |
| १६ | सुंर्याडिलक्स | सनफ्लॉवर | २०८ | ५ | ९४६.४० | १०४० | ७७ | ३५० | ७२८७३ |
| १७ | गोपाळ | मस्टर | १७६ | ५ | ८००.८० | ८८० | ८४ | ३८० | ६७२६७ |
| १८ | गौतम | सनफ्लॉवर | ६४ | ५ | २९१.२० | ३२० | ७७ | ३५० | २२४२२ |
| १९ | व्दारकेश | मस्टर | १३६ | ५ | ६१८.८० | ६८० | ८४ | ३८० | ५१९७९ |
| २० | शुभम | सिंगतेल | १६ | ५ | ७२.८० | ८० | ७९ | ३६० | ५७५१.२ |
| २१ | शाम | मस्टर | ३२ | ५ | १४५.६० | १६० | ८४ | ३८० | १२२३० |
| २२ | केशव | मस्टर | ६० | १ | ५४.६० | ६० | ८६ | ७८ | ४६९५.६ |
| २३ | गौतम | सनफ्लॉवर | ४३५ | १ | ३९५.८५ | ४३५ | ८४ | ७६ | ३३२५१ |
| २४ | सनटाईम | सनफ्लॉवर | ५४० | १ | ४९१.४० | ५४० | ८४ | ७६ | ४१२७८ |
| २५ | केशव | संरसों का तेल | १४४० | १ | १३१०.४० | १४४० | ८६ | ७८ | ११२६९४ |
| २६ | तीलडाप | तीळतेल | ४८० | १ | ४३६.८० | ४८० | १०४ | ९५ | ४५४२७ |
| | एकूण | | ५८०३ | | ३८२९२.६ | ४२०८२.५६ | | | ३२४८६८०२ |

## टाक्यांमधील प्रत्यक्ष साठा मोजमाप

| अ. क्र. | टाकी क्रमांक | तेलाचा प्रकार | साठा लिटर्स | साठा कि.ग्रॅ मध्ये | दर प्रति कि.ग्रॅ. | एकूण किंमत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | १ | राईचे तेल | ५२८५ | ४८०९.४ | ७७ | ३७०३१९.९५ |
| २ | २ | राईस ब्रॅड | ५९९३ | ५४५३.६ | ५४ | २९४४९६.०२ |
| ३ | ३ | कॉटनसिड | १३१८४ | ११९९७ | ५८ | ६९५८५१.५२ |
| ४ | ४ | रिकामी | ० | ० | ० | ०.०० |
| ५ | ५ | पामतेल | ५१८८ | ४७२१.१ | ४६ | २१७१६९.६८ |
| ६ | ६ | पामतेल | १८४१ | १६७५.३ | ४६ | ७७०६४.२६ |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ७ | ७ | कॉटनसिड | ४४६४ | ४०६२.२ | ५८ | ३५६६०९.९२ |
| एकूण | | | ३५९५५ | ३२७१९.०५ | | १८९०५११.३५ |

उपरोक्त युनीटच्या टाक्यांमधील सुट्टे व १ लिटर, ५ लिटर व १५ लिटर डब्यामधील सर्व प्रकारच्या खाद्यतेलाचे अधिकाऱ्यांनी पंच व विशाल अमरशी गाला यांचे समक्ष स्वच्छ पारदर्शक प्लास्टीकच्या १ लि. क्षमतेच्या बाटल्यांमध्ये प्रत्येकी तीन असे नमूने घेण्यात आले व त्यास सीलबंद करण्यात आले.

सदर विनापरवाना ठेवलेले खाद्यतेल व इतर मुद्देमाल पंचांसमक्ष घटनास्थळी आहे त्या स्थितीत जप्त करण्यात आला. जप्त मुद्देमालाचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ. क्र. | जप्त मुद्देमाल तपशिल | एकूण साठा | नग | जप्त मुद्देमालाची एकूण किंमत(रुपये) |
|---|---|---|---|---|
| १ | पॅक केलेल्या डब्यांमधील खाद्यतेल कि.ग्रॅ. मध्ये | ३२५०५.०० | | २७,६१,२००.००/- |
| २ | पॅक केलेल्या डब्यामधील खाद्यतेल कि.ग्रॅ. मध्ये | ५७८७.६० | | ४,८७,४८२.४५/- |
| ३ | टाक्यांमधील प्रत्यक्ष खाद्यतेल कि.ग्रॅ..मध्ये | ३२७१९.०५ | | १८,९०,५११.३५/- |
| ४ | पत्र्याचे रिकामे डबे १५ कि.ग्रॅ.क्षमतेचे | | १३४७ | ६७,३५०.००/- |
| ५ | प्लॅस्टीकचे रिकामे डबे ५ लिटर क्षमतेचे | | ५६३८ | १,४०,९५०.००/- |
| ६ | प्लॅस्टीकचे रिकामे डबे १५ लिटर क्षमतेचे | | १६० | ११,२००.००/- |
| ७ | प्लॅस्टीकचे रिकाम्या बाटल्या १ लिटर क्षमतेचे | | २४०० | १४,४००.००/- |
| ८ | पाऊंच मशीन | | १ | १,५०,०००.००/- |
| ९ | हॉरीझॉन एअर कॉम्प्रेसर | | १ | ७५,०००.००/- |
| १० | फिलींग मशीन फिलीप्स कंपनी | | १ | १,००,०००.००/- |
| ११ | सिलिंग मशीन जैनसन कंपनी | | १ | २०,०००.००/- |
| १२ | वजन काटा सी टॅक कंपनी | | १ | ६,०००.००/- |
| १३ | लोखंडी टाक्या ७ टाक्या | | ७ | ७,००,०००.००/- |
| १४ | इलेक्टीक मोटार | | १ | १५,०००.००/- |
| एकूण | | | | ६४,३९,०९३.८०/- |

तद्नंतर जप्त मुददेमालासह कंपनी सिलबंद करुन पोलीसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

अशाप्रकारे जप्त करण्यात आलेला खाद्यतेलाची विनापरवाना खरेदी, साठवणूक व विक्री करुन घटनास्थळी पामतेल तसेच कमी प्रतीचे खाद्यतेल हे विविध क्षमतेच्या डब्यांमध्ये पॅकींग करुन त्या डब्यांवर शेंगदाणा तेल, राईचे तेल, कपाशीचे तेल अशी विविध ब्रॅन्डची लेबले लावून त्यामधील खादयतेलाचा साठा हा उच्च प्रतीचा असल्याचे भासवून ग्राहकांची फसवणूक करीत असल्याचे निष्पन्न झाल्याने, पर्यायाने त्यांनी शासनाची तसेच उपभोक्त्यांची फसवणूक केल्याने, संबंधिताविरुध्द जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ३, ७, ८ व १०

CONTROLLER OF RATIONING ... MU

तसेच महाराष्ट्र शेडयूल्ड कमोडोटीज होलसेल डिलर्स लायसेंन्सींग ऑर्डर, १९९८ च्या तरतूदींचा भंग केल्याने त्यांचेविरुद्ध ए.पी.एम.सी. पोलिस ठाणे, नवी मुंबई येथे गुन्हा नोंद क्र. ३००३/२०१३, दिनांक १२/०१/२०१३ अन्वये गुन्हा नोंद करुन वरील मुद्देमाल जप्त करण्यात आला.

उपरोक्त जप्त मुद्देमालाची जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ प्रमाणे विल्हेवाट लावण्याची विनंती उपनियंत्रक शिधावाटप (अंमल), मुंबई यांनी वाचावे क्र. १ अन्वये केलेली असून त्यानुषंगाने जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-ब नुसार सर्व संबंधितांना वरील वाचावे क्र. २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे कारणे दाखवा नोटीस बजावून या प्रकरणी जप्त करण्यात आलेला मुद्देमाल सरकारजमा का करण्यात येऊ नये, याची कारणे स्पष्ट करणारा खुलासा मागविण्यात आला. तसेच मौखिक खुलासा करण्याची संधी म्हणून दिनांक ०५/०२/२०१३ रोजी या कार्यालयात सुनावणी ठेवण्यात आली.

दिनांक ०५/०२/२०१३ रोजीच्या सुनावणीस तपासी पोलिस अधिकारी तथा पोलिस निरिक्षक श्री. अरुण काटकर यांचे वतीने हेड कॉन्स्टेबल श्री. सी.बी. वक्ते यांनी उपस्थित राहून वाचा क्र. ४ अन्वये लेखी अभिवेदन सादर केले. सदर सुनावणीस ॲड. श्री. शरद सुर्यवंशी, मे. पोल लिगल ज्युरीस यांनी मे. गौतम मार्केटिंग यांचे वतीने वकालतनाम्यासह उपस्थित राहून टपालामार्फत सादर केलेले लेखी निवेदन कायम असल्याचे सांगितले. तसेच सदर सुनावणीस मे. गौतम मार्केटिंगचे मालक विशाल अमरशी गाला हे उपस्थित राहिले. सुनावणीस उपस्थितांनी त्यांना पंचनाम्याच्या प्रतीची आवश्यकता असल्याचे सांगून ती प्राप्त झाल्यानंतर सदर प्रकरणी युक्तीवाद करणार असल्याचे सांगून सुनावणीची पुढील तारीख मिळण्यास विनंती केली. सबब, संबंधितांना त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी पुढील सुनावणी दिनांक २०/०२/२०१३ रोजी ठेवण्यात आली. सदर प्रकरणाची दिनांक २०/०२/२०१३ रोजी ठेवण्यात आलेली सुनावणी प्रशासकीय कारणास्तव रद्द करण्यात आली. सबब, संबंधितांना त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी पुढील सुनावणी दिनांक ०५/०३/२०१३ रोजी ठेवण्यात आली.

मे. गौतम मार्केटिंग यांनी मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल केलेल्या रिट पिटीशन क्र. ६४४/२०१३ अन्वये दिनांक २०/०२/२०१३ रोजीच्या सुनावणीस मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी नमूद गोदाम दिनांक २५/०२/२०१३ पर्यंत सिलमुक्त करुन गोदामातील जप्त खाद्यतेलाचा साठा हा दिनांक २७/०२/२०१३ पर्यंत इतरत्र सुरक्षित ठिकाणी स्थलांतरीत करण्याचे निर्देशित केले. त्यानुसार वाचावे क्र. ६ अन्वये नमूद गोदाम सिलमुक्त करण्याचे पत्र निर्गमित करण्यात आले.

DIRECTOR OF CIVIL SUPPLIES OFFICE ... BAI

अन्न व औषध प्रशासन विभाग, वांद्रे, मुंबई यांचे वाचावे क्र. ७ अन्वये प्राप्त झालेल्या पृथ:करण अहवालामध्ये, "and I am of the opinion that above all Samples confirm to their respective standards as per Food Safety and Standards (Food Products Standards and Food Additives) Regulation 2011. Except Sample No K-8, K-14, L-5 and L-38 does not confirm to the Standards of Groundnut Oil, Soyabean Oil, Mustard Oil and Cotton Seed Oil respectively as per Food Safety and Standards (Food Products Standards and Food Additives) Regulation 2011.", असे नमूद आहे.

उपरोक्त पृथ:करण अहवालानुसार जप्त करण्यात आलेल्या खाद्यतेलाच्या साठ्याच्या घेण्यात आलेल्या नमुन्यांपैकी शेंगदाणा तेल, सोयाबिन तेल, राई तेल व कपासी तेलाचा साठा हा भेसळयुक्त असल्याचे तसेच तो मानवीय खाण्यास अयोग्य असल्याचे निष्पन्न झाले. तत्पुर्वी मे. गौतम मार्केटिंग यांचा जप्त असलेला खाद्यतेलाचा सुटा तसेच पॅकबंद डब्यांमधील संपूर्ण साठा इतरत्र सुरक्षित ठिकाणी स्थलांतरीत करण्याचे प्रस्तावित होते. त्याअनुषंगाने जप्त साठ्याच्या पृथ:करण अहवालानुसार भेसळयुक्त असल्याचे सिध्द झाल्याने व प्रकरणी सुनावणीची प्रक्रिया पूर्ण होऊन अंतीम निकालपत्र देण्यास विलंब होणार असल्याने, भेसळयुक्त नसलेला साठा वैध परवानाधारकास व उर्वरीत भेसळयुक्त साठा हा मानवीय खाण्याव्यतिरिक्त इतर व्यवसायीकांना प्रचलित दराने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करण्याचे वाचावे क्र. ८ अन्वये अंतरीम आदेश पारीत करण्यात आले.

दिनांक ०५/०३/२०१३ रोजीच्या सुनावणीस ॲड. श्री पी. ए. पोळ यांनी मे. गौतम मार्केटिंगचे मालक यांचेवतीने वाचावे क्र. १० अन्वये लेखी निवेदन सादर करुन सदर प्रकरणी अन्न व औषध प्रशासन विभागाकडून प्राप्त पृथ:करण अहवाल तसेच अमीत अमरशी गाला यांचा घटनास्थळी नोंदविण्यात आलेल्या जबाब या दस्ताऐवजांच्या छायांकित प्रतींची मागणी करुन त्याअनुषंगाने पुढील सुनावणीस निवेदन सादर करणार असल्याचे सांगितले. सदर सुनावणीच्या वेळी खाद्यतेलाच्या घाऊक परवानावरील नमुद जुन्या व्यवसायाच्या पत्यावरील गुमास्ता परवाना, अन्न व औषध प्रशासन विभागाकडील परवाना इ. तसेच घटनास्थळी नवीन पत्यावरील प्राप्त परवान्यांच्या छायांकित प्रती सादर करण्यास सुचित केले असता, सदरची कागदपत्रे सादर करण्यासाठी पुढील सुनावणी मिळण्यास विनंती केली. सबब, संबंधितांना त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी पुढील सुनावणी दिनांक १२/०३/२०१३ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक १२/०३/२०१३ रोजीच्या सुनावणीस मे. गौतम मार्केटिंगचे मालक यांनी उपस्थित राहुन त्यांचे वकील ॲड. श्री पी. ए. पोळ यांचे वाचावे क्र. ११ अन्वये लेखी निवेदन सादर करुन त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी

CONTROLLER OF RATIO

पुढील सुनावणीकरीता १५ दिवसांची मुदत मागितली आहे. मे. गौतम मार्केटिंगचे मालक यांना नैसर्गिक न्याय म्हणून आजमितीस त्यांना त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी पुरेशी संधी देण्यात येवुन देखिल त्यांनी विविध सबबी सांगुन पुढील सुनावणीकरीता विनंती केलेली आहे. सबब, संबंधितांना त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी अंतीम सुनावणी दिनांक २६/०३/२०१३ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक २६/०३/२०१३ रोजीच्या अंतीम सुनावणीस मे. गौतम मार्केटिंग यांचे वतीने कोणीही उपस्थित राहिले नाहीत. संदर प्रकरणी मे. गौतम मार्केटिंगचे मालक यांना पुरेशी संधी देण्यात आली आहे.

सबब, संदरचे प्रकरण गुणवत्तेवर निर्णयास्तव राखून ठेवण्यात आले.

**युक्तिवाद :-**

उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे यांचा दिनांक ०४/०२/२०१३ रोजी टपालामार्फत प्राप्त अहवालात, १) परवान्याचे नाव व पत्ता - मे. गौतम मार्केटिंग, एल-५९, एपीएमसी मार्केट-१, फेज-२, वाशी, नवी मुंबई. २) परवाना क्र. - ४१/फ/वाशी/सं.प./७८१(घा.). ३) परवानाधारकाचे नाव - विशाल उमरशी गाला. ४) परवान्यावरील अनुसुचित वस्तू - खाद्यतेल. ५) परवान्याची वैधता - दिनांक ३१.१२.२०१४. ६) परवानाधारकाने दि.२०.०४.२०११ व दि.१७.०९.२०१२ रोजी पत्त्यात बदलासाठी अर्ज केलेले आहे. तसेच क्र.४१/फ/वाशी/परवाना/२०१३/जा. २८४, दि.२८.०१.२०१३ अन्वये प्राप्त अहवालानुसार सद्यःस्थिती पुढीलप्रमाणे आहे. १) जागेचा भाडे करारनामा - दि.३०.११.२०१३ पर्यंत वैध आहे. २) जागेच्या मुळ मालकाच्या नावचे सिडकोचे दि.२१.०१.२००९ चे ट्रान्सफर आदेश. ३) गुमास्ता परवाना - दि.३१.०३.२०१३ पर्यंत वैध आहे. ४) अन्नसुरक्षा परवाना - दि.३१.१२.२०१५ पर्यंत वैध आहे. सदर प्रकरणी कागदपत्रांची पुर्तताही दिनांक ११/०१/२०१३ रोजी म्हणजेच परवानाधारकाविरुध्द केलेल्या कारवाई नंतर झाली असल्याने परवान्यामधील पत्ता बदली करीता केलेला अर्ज ग्राह्य धरता येणार नाही. सबब, घटनास्थळी कार्यरत असलेला खाद्यतेलाचा व्यवसाय हा विनापरवाना व अवैध समजण्यात यावा, असे नमूद आहे.

दिनांक ०५/०२/२०१३ रोजीच्या सुनावणीस उपस्थित तपासी पोलिस अधिकारी तथा पोलिस निरिक्षक श्री. अरुण काटकर यांचे वतीने हेड कॉन्स्टेबल श्री. सी.बी. वक्ते यांनी सादर केलेल्या लेखी अभिवेदनात, एकंदरीत झाले तपासावरुन यातील अटक आरोपी याचे मे. गौतम मार्केटिंग कंपनीमध्ये जप्त करण्यात आलेले खाद्यतेल त्यांने विनापरवाना खरेदी, साठवणूक व विक्री करुन पामतेल तसेच कमी प्रतीचे खाद्यतेल हे विविध क्षमतेच्या डब्यांमध्ये

G & DIRECTOR ... D OFFICE ... MUMBAI

पॅकिंग करुन त्या डब्यांवर शेंगदाणा तेल, राईचे तेल, कपाशीचे तेल अशी विविध ब्रॅन्डची लेबल लावून त्यामधील खाद्यतेलाचा साठा हा उच्च प्रतीचा असल्याचे भासवूण ग्राहकांची फसवणूक करीत असल्याचे निष्पन्न होत आहे. यातील अटक आरोपी विशाल अमरशी गाला याचेकडे पोलिस कोठडी रिमांडचे मुदतीत केलेल्या चौकशीत त्याने मे. गौतम मार्केटिंग या नावाने खाद्यतेलांचा व्यापार ते सन २००७ पासून करत आहेत. सदरचा व्यापार ते प्लॉट नंबर ४२, सेक्टर १९ ए, एपीएमसी धान्य मार्केट समोर, वाशी, नवी मुंबई या गोडावूनमध्ये मार्च २०११ पासून करत आहेत. सदर गोडाऊनचे मालक श्री. अमरजितसिंग धिल्लॉन व सुरजितकौर हे असून सदरचा गाळा त्यांनी त्यांचेकडून दिनांक ०१/०३/२०११ ते दिनांक ३०/११/२०१३ या कालावधीकरता भाडेतत्त्वावर चालविण्यास घेतला आहे. त्याबाबत त्यांचेमध्ये १२०००/- रुपयाचे स्टॅम्पपेपरवर करारनामा झालेला असून त्याचे रजिस्ट्रेशन करण्यात आले आहे. वर नमुद गोडाऊनमध्ये व्यापार करण्यापूर्वी ते सदरचा व्यापार एपीएमसी मसाला मार्केट-१, फेज-२, गाळा क्र. एल/५९, सेक्टर १९, वाशी, नवी मुंबई या ठिकाणी करत होते. तेथील करारनाम्याची मुदत संपल्याने वरील ठिकाणी व्यापार चालू केलेला आहे. त्यांचे मे. गौतम मार्केटिंग कंपनीचे १) दुकान निरिक्षक यांचा गुमास्ता लायसन्स, २) उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे यांचा खाद्यतेलाचा परवाना, ३) अन्न व औषध प्रशासन, ठाणे (एफ.एस.एस.आय.) यांचा परवाना, ४) सेल्स टॅक्सचा परवाना (वॅट टॅक्स) इत्यादी वैध परवाने आहेत. सदर परवान्यातील उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे यांचा खाद्यतेलाचा परवान्यातील व्यापाराचा पत्ता एपीएमसी मसाला मार्केट-१, फेज-२, गाळा क्र. एल/५९, सेक्टर १९, वाशी, नवी मुंबई असा असून त्यामध्ये बदल होणेकरता त्यांनी मा. उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ यांचेशी पत्रव्यवहार केला असून त्यांचेकडून अद्यापपर्यंत परवान्यातील पत्त्यामध्ये बदल झालेला नाही. मे. गौतम मार्केटिंग कंपनीत ते इंम्पोर्टर तसेच कंपन्यांमधून पामतेल, कपासी तेल (कॉटनसीड), सरसोका तेल (मस्टर्ड), रिफाईन्ड राईस तेल, शेंगदाण तेल, सनफ्लॉवर तेल (सुर्यमुखी) इत्यादी सुट्टे खाद्यतेल मागवुन ते तेल त्यांचे कंपनीतील लोखंडी टाक्यामध्ये साठवणूक करुन ते १५ लिटर, ५ लिटर प्लॅस्टीक तसेच पत्र्याचे डब्यामध्ये तसेच १ लिटर प्लॅस्टिक बॉटल, प्लॅस्टिक पाऊचमध्ये पॅकींग करुन त्यावर मे. गौतम मार्केटिंग कंपनीतर्फे पॅकींग करण्यात आल्याचे नाव नमुद करुन त्यावर ग्रेट सन, सुप्रीम, राधाराईस, ईगल राईस, सौराष्ट्र, पुजा, गौतम, प्लेन, सनी, तीलड्रॉप, गुजरात, शेंगदाणा तेल, स्वादीष्ट अशा नावाचे ब्रॅन्डचे बनविलेले लेबल लावून त्याची मार्केटमधील रिटेल दुकानदार यांना विक्री करतात. ते वापरत असलेल्या वर नमूद नावाचे ब्रॅन्डचे त्यांनी रजिस्ट्रेशन केलेले नसून ते इतर कोणाचे रजिस्टर ब्रॅन्डचा त्यांचे व्यापारकरता वापर करत नाहीत असे सांगत असल्याचे तसा त्यांचा सविस्तर जबाब घेण्यात आला आहे. सदर गुन्ह्यात जप्त करण्यात आलेले खाद्यतेल व

CONTROLLER OF RATIONING

इतर मुद्देमालातील खाद्यतेल हे यातील अटक आरोपी यांने त्याचे मे. गौतम मार्केटिंग कंपनीमध्ये विनापरवाना खरेदी, साठवणूक व विक्री करुन पामतेल तसेच कमी प्रतीचे खाद्यतेल हे विविध क्षमतेच्या डब्यांमध्ये पॅकींग करुन त्या डब्यांवर शेंगदाणा तेल, राईचे तेल, कपाशीचे तेल अशी विविध ब्रॅन्डची लेबल लावून त्यामधील खाद्यतेलाचा साठा हा उच्च प्रतीचा असल्याचे भासवून ग्राहकांची फसवणूक करीत असल्याचे निष्पन्न झाले आहे. तरी नमुद खाद्यतेल व इतर मुद्देमालाबाबत योग्य तो आदेश होणेस विनंती आहे, असे नमूद केले आहे.

मे. गौतम मार्केटींगचे मालक विशाल अमरशी गाला यांचेवतीने ॲड. पी.ए. पोळ यांचे दिनांक ०५/०२/२०१३ रोजी टपालांमार्फत प्राप्त निवेदनात, त्यांच्या अशिलास कारणे दाखवा नोटीस सोबत आवश्यक पुरावादर्शक कागदपत्रे ज्या आधारे नोटीस बजावण्यात आली आहे. ती कागदपत्रे त्यांना प्राप्त झालेली नाहीत. घटनास्थळी तयार करण्यात आलेल्या पंचनाम्याची प्रत पोलिस ठाणे येथून पोलिस ठाणे येथून प्राप्त करुन घेण्याबाबत शिधावाटप अधिकारी यांनी निर्देशित केले. तथापी, पोलिसांनी पंचनाम्याची प्रत न देता ती शिधावाटप विभागाकडून प्राप्त करुन घ्यावी असे सांगितले. त्यामुळे सद्यस्थितीत सुनावणी स्थगित करुन पुढील ठेवण्यात येणाऱ्या सुनावणीपूर्वी सर्व कागदपत्रांचे प्रत त्यांच्या अशिलास देण्यात यावी. जेणेकरुन त्यांना कारणे दाखवा नोटीसमधील नमूद मुद्यांच्या अनुषंगाने निवेदन देणे शक्य होईल, असे नमूद केले आहे.

मे. गौतम मार्केटींगचे मालक विशाल अमरशी गाला यांचेवतीने ॲड. पी. ए. पोळ यांचे दिनांक ०४/०३/२०१३ रोजी टपालांमार्फत प्राप्त निवेदनात, दिनांक २६/०२/२०१३ रोजी पारीत करण्यात आलेले अंतरीम आदेश त्यांच्या अशिलास दिनांक २८/०२/२०१३ रोजी सायंकाळी वाशी पोलिस ठाण्यामार्फत प्राप्त झाली आहे. सदर अंतरीम आदेशाचे अवलोकन करता आपल्या कार्यालयात पृथःकरण अहवाल दिनांक २५/०२/२०१३ रोजी प्राप्त झाला असून याप्रकरणी पुढील सुनावणी दिनांक ०५/०३/२०१३ रोजी आपल्या कार्यालयात ठेवण्यात आली आहे. सदर सुनावणीपूर्वी त्यांच्या अशिलास पृथःकरण अहवालाची प्रत देण्याबाबत संबंधित अधिकारी यांना निर्देशित करण्यात यावे, असे नमूद केले आहे.

दिनांक ०५/०३/२०१३ रोजीच्या सुनावणीस उपस्थित ॲड. श्री पी. ए. पोळ यांनी मे. गौतम मार्केटिंगचे मालक यांचेवतीने सादर केलेल्या निवेदनात, दिनांक ०५/०२/२०१३ रोजीच्या सुनावणीची नोटीस त्यांच्या अशिलास दिनांक २२/०१/२०१३ रोजी प्राप्त झाली. सदर सुनावणीस उपस्थित राहून त्यांनी आवश्यक कागदपत्रे आपल्या कार्यालयातून प्राप्त करुन घेण्यासाठी निवेदन सादर करुन सुनावणी स्थगित ठेवण्याची विनंती केली. त्यांच्या अशिलास पंचनामा आणि जबाबाव्यतिरिक्त इतर कागदपत्रांच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन दिलेल्या

DIRECTOR OF CIVIL SUPPLIES ... OFFICE MUMBAI

नाहीत. तद्नंतर दिनांक २०/०२/२०१३ रोजीच्या सुनावणीची नोटीस प्राप्त झाली. तथापी, सदर सुनावणी प्रशासकिय कारणास्तव रद्द करण्यात आली. दरम्यान काळात त्यांच्या अशिलाने उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ यांच्या कार्यालयात अर्ज करुन फटाळण्यात आलेल्या पत्राच्या छायांकित प्रतींची मागणी करण्यात आली. अंतरीम आदेशानुसार पृथःकरण अहवालासंबंधात अन्न व औषध प्रशासन विभाग यांचेकडे अपिल दाखल करण्याकरिता दिनांक ०१/०३/२०१३ रोजी आवश्यक कागदपत्रांची मागणी करण्यात आली. त्यांचे अशिलावर आरोप लावण्यात आले की, त्याने खाद्यतेलाची विक्री, साठवणूक व खरेदी विनापरवाना करुन पामतेल अथवा इतर कमी प्रतीच्या तेलाचे विविध पॅकबंद डब्यात पॅक करुन सदरचा साठा हा उच्च प्रतीचा असल्याचे भासवून ग्राहकांची व शासनाची दिशाभूल करुन १९९८ या आदेशाच्या तसेच जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ च्या तरतूदींचा भंग केल्याचे नमूद केले आहे. त्यांचे अशिल खाद्यतेलचा व्यवसाय त्यांच्याकडील डिसेंबर, २०१४ पर्यंत वैध असलेल्या परवान्यानुसार करीत आहे. त्यांच्या अशिलाने एल ५९, एपीएमसी मार्केट-१, वाशी, नवी मुंबई या पत्त्यावर सुरुवातीस व्यवसाय सुरु केला. सदर जागा ऑगस्ट, २०११ पर्यंत भाडेतत्त्वार होती. सदर जागेत जागेच्या कमतरतेमुळे व्यवसाय करणे शक्य नसल्याने त्यांच्या अशिलाने दुसरी जागा भाडेतत्त्वावर प्राप्त केली व त्यानुसार प्लॉट नं. ४२, सेक्टर १९ अे, दाणाबंदर, वाशी येथे व्यवसाय करीत आहे. त्यांच्या अशिलाने टाक्या बसविण्यास सुरु करुन तद्नंतर एप्रिल, २०११ मध्ये सक्षम प्राधिकारी यांचेकडे परवान्यावरील पत्त्यात बदल करण्यासाठी अर्ज केला. मे, २०११ मध्ये सर्व परवान्यांची पूर्तता करुन त्यांच्या अशिलाने नविन जागेत व्यवसायाचे स्थलांतर केले. माहे सप्टेंबर, २०१२ मध्ये त्यांना मौखिक सांगण्यात आले की, पत्ता बदली करीता दिलेला अर्ज हा सापडत नसल्याने नविन अर्ज करण्यात यावा. त्यानुसार त्यांच्या अशिलाने दिनांक १७/०९/२०१२ रोजी नविन अर्ज सादर केला. तोपर्यंत सक्षम प्राधिकारी यांनी कोणतेही पावले उचलले नाही. त्यामुळे त्यांच्या अशिलाचा नमूद जागेतील व्यवसाय हा विनापरवाना नसल्याचे दिसून येते. कारणे दाखवा नोटीसीनुसार त्यांच्या अशिलावर आरोप करण्यात आले की, तो कमी प्रतींचे तेल पॅकिंग करुन तो उच्च प्रतीचा असल्याचे दाखवून शेंगदाणा तेल, राई तेल, कपासी तेल इत्यादी असल्याचे भासवित आहे. सदर आरोप त्यांच्या अशिलास मान्य नाहीत. त्यामुळे जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ व १९९८ या आदेशाचा भंग केला नसल्याचे दिसून येते. अशिलाकडे विविध प्रकारच्या तेलाचे वैध खरेदी बिले आहेत. अशिलाने प्रत्येक प्रकारच्या तेलासाठी वेगवेगळी टाकी ठेवली आहे. कारणे दाखवा नोटीसमध्ये १९९८ व जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चा भंग केल्याबाबतचे कोणतेही मुद्दे नमूद नाहीत. अशिलास विविध एजन्सीकडून विविध प्रकारचे खाद्यतेल हे खरेदी बिलानुसार प्राप्त झाले आहे. त्यानुसार साठापुस्तकात तशी नोंद

घेण्यात आली आहे. त्यांच्या अशिलाकडे सर्व खरेदी बिले व विक्री बिले उपलब्ध असून त्याच्या नोंदी प्रत्येक वर्गवारीनुसार घेण्यात आली आहे. सदरची सर्व बिले तपासणीकरीता उपलब्ध करुन देण्यात येईल. त्यामुळे बजावण्यात आलेली कारणे दाखवा नोटीस ही अवैध व कार्यक्षेत्राबाहेरची आहे. त्यामुळे कारणे दाखवा नोटीसमधील मुद्दे हे ग्राह्य धरणे शक्य नसल्याने जप्त साठ्याचे विल्हेवाटीचा प्रश्न उद्भवत नाही. त्यामुळे विना अटी व शर्तीचे साठा परत करण्याबाबत संबंधित प्राधिकरणास कळविण्यात यावे. कारणे दाखवा नोटीसनुसार अधिकाऱ्यांनी दिनांक ११/०१/२०१३ रोजी त्यांच्या अशिलाचा तेलाचा साठा जप्त करुन दिनांक १२/०२/२०१३ रोजी वाशी पोलिस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तथापी, इतर अभिलेख व कारणे दाखवा नोटीसचे अवलोकन करता संबंधित अधिकारी यांनी विहित मुदतीमध्ये आपल्याकडे अहवाल सादर केला नाही. तसेच सदर अधिकारी यांनी कायदेशिर कारवाई सुरु करण्यापूर्वी परवानगी घेतली नाही. जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ मधील तरतुदींनुसार कलम ३ अन्वये अमलात असलेल्या आदेशाच्या अनुषंगाने साठा जप्त करण्याचे अधिकार आहेत. त्यानुसार संबंधित व्यक्तीने आपल्याकडे वेळ न दडवता अवगत करुन सदर साठ्याचे निरिक्षणासाठी आपल्या समोर विनंती करुन तद्नंतर आपण दिलेल्या आदेशानुसार कायदेशिर कारवाई करणे योग्य आहे. तथापी, सदर प्रकरणी दिनांक ११/०२/२०१३ रोजी साठा जप्त करुन संबंधित अधिकारी यांनी साठ्याच्या तपासणीसाठी आपणाकडे अहवाल सादर केला नाही. तसेच नियमानुसार कायदेशिर कारवाई करण्यापूर्वी आपली लेखी परवानगी घेतली नाही. त्यामुळे पथकाने अवैधरित्या साठा जप्त केला असल्याने जप्त साठ्याच्या विल्हेवाटीचा प्रश्न उद्भवत नाही. त्यामुळे संबंधित प्राधिकरणास निर्देशित करुन जप्त साठा मुक्त करुन अशिलास देण्यात यावा. त्यांच्या अशिलाने जीवनावश्यक वस्तूचे उत्पादन, वितरण व पुरवठा यामध्ये कोणत्याही प्रकारे अडथळा निर्माण केलेला नसल्याने त्यांच्या अशिलाने जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ च्या उद्दीष्टांचा भंग केलेला नाही. तसेच त्यांच्या अशिलाने अनुसुचित वस्तूच्या पुरवठ्यामध्ये अडथळा न आणल्याने बाजारपेठेत अनियमित पुरवठ्याचा प्रश्न उद्भवत नाही. सदर प्रकरणी, साठा जप्त करुन गोदाम सिलबंद केल्याने त्यांच्या अशिलास व्यवसाय करणे शक्य झाले नसून त्यामुळे त्यांच्या अधिपत्त्याखालील कामगार वर्ग हा काम नसल्याने बसून आहे. त्यामुळे विना उत्पादन व व्यवसायाशिवाय त्यांच्या अशिलावर खर्चाचा बोजा वाढत आहे. अशिलाने व्यवसायाकरीता कर्ज घेतले असून तो बंद असल्याने कर्जाचे हफ्ते फेडणे शक्य झाले नाही. अधिकाऱ्यांनी अवैधरित्या गोदामा सिलबंद करुन अशिलाचा व्यवसाय बंद केला आहे. त्यामुळे दिनांक २१/०१/२०१३ रोजी बजावण्यात आलेली कारणे दाखवा नोटीस परत

घेऊन जप्त करण्यात आलेला साठा हा नैसर्गिक न्याय म्हणून त्यांच्या अशिलास परत करण्यात यावा, असे नमूद केले आहे.

दिनांक १२/०३/२०१३ रोजीच्या सुनावणीस उपस्थित ॲड. श्री पी. ए. पोळ यांनी मे. गौतम मार्केटिंगचे मालक यांचेवतीने सादर केलेल्या निवेदनात, दिनांक ०५/०२/२०१३ रोजीच्या सुनावणीस उपस्थित राहून पृथ:करण अहवालाची मागणी केली. त्यानुसार दिनांक २२/०२/२०१३ रोजीचे पृथ:करण अहवाल त्यांना दिनांक ०६/०३/२०१३ रोजी प्राप्त झाले. त्यानुसार सदर पृथ:करण अहवालाबाबत संबंधित प्राधिकरणाकडे अपिल दाखल करण्यात आले आहे. मा. उच्च न्यायालय यांनी पारीत केलेले अंतरीम आदेश पुढील कालावधीसाठी सुरु ठेवले असून त्यांना दिनांक २६/०२/२०१३ रोजी पारीत केलेल्या अंतरीम आदेशानुसार आहवान देण्याकरीता पिटीशनमध्ये सुधारण्या करण्यास परवानगी दिली आहे. त्यांच्या अशिलाने मा. उच्च न्यायालय येथे उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ यांना परवान्यावरील पत्त्यात बदल करण्यासंदर्भात योग्य निर्देशन पारीत करण्याकरिता अलाहिदा पिटीशन दाखल केले आहे. त्यामुळे सद्यस्थितीत सुनावणी स्थगित ठेऊन पुढील सुनावणी १५ दिवसानंतर ठेवण्यात यावी, असे नमूद केले आहे.

<u>निष्कर्ष</u> :-

प्रस्तुत प्रकरणातील अपचारी यांचा युक्तिवाद, निवेदन, पोलिसांचे अभिवेदन व अभिलेखावरील उपलब्ध पुरावादर्शक कागदपत्रे विचारात घेऊन मी खालील प्रमाणे निष्कर्ष काढीत आहे.

प्रस्तूत प्रकरणी, दिनांक ११/०१/२०१३ रोजी मे. गौतम मार्केटिंग, प्लॉट नंबर ४२, सेक्टर-१९ अे, एपीएमसी, दानाबंदर समोर, वाशी, नवी मुंबई या कंपनीमध्ये पामतेल तसेच कमी प्रतीचे खाद्यतेल हे विविध क्षमतेच्या डब्यांमध्ये पॅकींग करुन त्या डब्यांवर शेंगदाणा तेल, राईचे तेल, कपाशीचे तेल अशी लेबले लावून त्यामधील खाद्यतेलाचा साठा हा उच्च प्रतीचा असल्याचे भासवून ग्राहकांची फसवणूक करीत असल्याच्या या कार्यालयास मिळालेल्या खात्रीलायक खबरीनुसार या कार्यालयातील फिरत्या पथकातील अधिकारी/कर्मचारी यांनी सदर ठिकाणी धाड टाकली असता मे. गौतम मार्केटींगचे मालक विशाल अमरशी गाला यांचेकडे सदर अनुसूचित वस्तु असलेल्या खाद्यतेलाच्या व्यवसायाकरीता महाराष्ट्र अनुसूचित वस्तु घाऊक व्यापार अनुज्ञाप्ती आदेश, १९९८ अन्वये घाऊक परवान्याबाबत विचारणा केली असता नमूद पत्त्यावर त्यांचेकडे परवाना नसल्याचे आढळुन आल्याने मे. गौतम मार्केटींगचे मालक यांचेविरुद्ध ए.पी.एम.सी. पोलिस ठाणे, नवी मुंबई येथे गुन्हा नोंद क्र. ३००३/२०१३,

दिनांक १२/०१/२०१३ अन्वये गुन्हा नोंद करुन विविध खाद्यतेलाचा व इतर असा एकूण रुपये ६४,३९,०९३.६०/-
किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

अनुज्ञप्ती प्राधिकारी तथा उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे यांच्याकडून प्राप्त अहवालात, मे. गौतम मार्केटिंग या व्यवसायिक नावाने एल-५९, एपीएमसी मार्केट-१, फेज-२, वाशी, नवी मुंबई या जुन्या व्यवसायिक पत्त्यावर खाद्यतेलाचा घाऊक परवाना क्र. ४१/फ/वाशी/सं.प./७८१(घा.) असुन त्याची वैधता दिनांक ३१.१२.२०१४ पर्यंत आहे. सदर परवानाधारकाने दि.२०.०४.२०११ व दि.१७.०९.२०१२ रोजी पत्त्यात बदलासाठी अर्ज केलेले आहे. शिधावाटप अधिकारी, शिधावाटप कार्यालय क्र. ४१/फ/वाशी यांनी दि.२८.०१.२०१३ रोजी सादर केलेल्या अहवालानुसार मे. गौतम मार्केटिंगचे मालक विशाल अमरशी गाला यांनी सदर प्रकरणी कागदपत्रांची पुर्तता दिनांक ११/०१/२०१३ रोजी म्हणजेच परवानाधारकाविरुध्द केलेल्या कारवाई नंतर केली असल्याने परवान्यामधील पत्ता बदली करीता केलेला अर्ज ग्राह्य धरता येणार नाही. सबब, घटनास्थळी कार्यरत असलेला खाद्यतेलाचा व्यवसाय हा विनापरवाना व अवैध समजण्यात यावा, असे नमूद आहे.

तपासी पोलिस अधिकारी तथा पोलिस निरिक्षक श्री. अरुण काटकर यांचे वतीने प्राप्त अभिवेदनात, एकंदरीत झाले तपासावरुन यातील अटक आरोपी याचे मे. गौतम मार्केटिंग कंपनीमध्ये जप्त करण्यात आलेले खाद्यतेल त्यांने विनापरवाना खरेदी, साठवणूक व विक्री करुन पामतेल तसेच कमी प्रतीचे खाद्यतेल हे विविध क्षमतेच्या डब्यांमध्ये पॅकिंग करुन त्या डब्यांवर शेंगदाणा तेल, राईचे तेल, कपाशीचे तेल अशी विविध ब्रॅन्डची लेबल लावून त्यामधील खाद्यतेलाचा साठा हा उच्च प्रतीचा असल्याचे भासवूण ग्राहकांची फसवणूक करीत असल्याचे निष्पन्न होत आहे. मे. गौतम मार्केटिंग या नावाने खाद्यतेलाचा व्यापार ते सन २००७ पासून करत आहेत. सदरचा व्यापार ते प्लॉट नंबर ४२, सेक्टर १९ ए, एपीएमसी धान्य मार्केट समोर, वाशी, नवी मुंबई या गोडावूनमध्ये मार्च २०११ पासून करत आहेत. सदर गोडाऊनमध्ये व्यापार करण्यापूर्वी ते एपीएमसी मसाला मार्केट-१, फेज-२, गाळा क्र. एल/५९, सेक्टर १९, वाशी, नवी मुंबई या ठिकाणी करत होते. मे. गौतम मार्केटिंग कंपनीतर्फे पॅकींग करण्यात आल्याचे नाव नमुद करुन त्यावर ग्रेट सन, सुप्रीम, राधाराईस, ईगल राईस, सौराष्ट्र, पुजा, गौतम, प्लेन, सनी, तीलड्रॉप, गुजरात, शेंगदाणा तेल, स्वादीष्ट अशा नावाचे ब्रॅन्डचे बनविलेले लेबल लावून त्याची मार्केटमधील रिटेल दुकानदार यांना विक्री करतात. ते वापरत असलेल्या वर नमूद नावाचे ब्रॅन्डचे त्यांनी रजिस्ट्रेशन केलेले नाही. तरी नमुद खाद्यतेल व इतर मुद्देमालाबाबत योग्य तो आदेश होणेस विनंती आहे, असे नमूद केले आहे.

महाराष्ट्र अनुसूचित वस्तु घाऊक व्यापार अनुज्ञाप्ती आदेश, १९९८ चे कलम ११(१) अन्वये "No licensee or his agent or servant or any other person acting on his behalf shall contravene any of the terms and conditions of the license " असे नमूद आहे.

कलम ११(२) अन्वये " If the Licensing authority is satisfied that any such licensee or his agent or servant or any other person acting on his behalf contravene any of the said terms or conditions, it may, without prejudice to any other action that may be taken against him, by order in writing cancel or suspend his licence either in respect of all scheduled commodities covered by it or in respect of such of close commodities as it may think fit " असे नमूद आहे.

महाराष्ट्र अनुसूचित वस्तु घाऊक व्यापार अनुज्ञाप्ती आदेश, १९९८ चे कलम ४(२) अन्वये देण्यात आलेल्या घाऊक परवानामधील अट क्र. १३ मध्ये " The licensee shall be liable for departmental action, prosecution or both as the case may be for the breach of any condition of this license or any directions or orders issued by the Government or licensing authority from time to time " असे नमूद आहे.

उपरोक्त विवेचन व अभिलेखावरील उपलब्ध कागदपत्रे विचारात घेता मे. गौतम मार्केटिंगचे मालक विशाल अमरशी गाला यांनी प्लॉट नंबर ४२, सेक्टर १९ ए, एपीएमसी धान्य मार्केट समोर, वाशी, नवी मुंबई या गोडावूनमध्ये खाद्यतेलाचा व्यवसाय मार्च २०११ पासून कार्यरत ठेवला आहे. सदर व्यवसायाकरीता आवश्यक असलेले इतर प्राधिकरणाशी संबंधित परवाने त्यांनी विहीत वेळेत स्थलांतरीत करुन घेतल्याचे दिसुन येते. तथापी, या विभागाकडील घाऊक परवाना हा त्यांच्या जुना व्यवसायाच्या पत्त्यावरील असल्याचे माहित असुन सुद्धा त्यांनी नविन पत्त्यावर घाऊक परवान्याचे हस्तांतरण करुन घेण्याकरीता तपासणीचे दिवसापर्यंत कागदपत्रांची पुर्तता करण्याची तसदी घेतली नाही ही आश्चर्यजनक बाब आहे. मे. गौतम मार्केटिंगचे मालक विशाल अमरशी गाला यांना पथकाने घटनास्थळी परवान्यावरील घटनास्थळापासून वेगळा पत्ता असल्याची बाब निदर्शनास आणून दिली असता, सदर परवान्यावरील नमूद पत्त्याची नोंद व पत्ता बदलण्याकरिता दिनांक २०.०४.२०११ रोजी संबंधित कार्यालयात अर्ज सादर केल्याचे सांगून सदर पत्ता बदलच्या अर्जासोबत आवश्यक कागदपत्रांची पुर्तता न केल्याची बाब संबंधित कार्यालयाच्या अधिकाऱ्यांनी स्थळ भेटीच्या वेळी सांगितले. त्यामूळे जागेच्या पुराव्याबाबत मागणी केल्यानुसार कोणताही पुरावा सादर न केल्याने त्याचा अर्ज निकाली काढण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. तद्नंतर दिनांक १७.०९.२०१२ रोजी परवान्यावरील पत्ता बदली करण्याकरिता नव्याने अर्ज केल्याचे सांगून सदर अर्जासोबतही जागेच्या पुराव्याबाबत आवश्यकतेनुसार कोणताही ठोस पुरावा सादर केला नसल्याची बाब अधिकारी

व पंचांसमक्ष त्यांनी कबूल केली आहे. मे. गौतम मार्केटिंगचे मालक यांनी सुनावणीच्या वेळी केलेल्या खुलाश्यात विविध सबबी सांगुन परवानाधारक म्हणून त्यांचेवर असलेली जबाबदारी पार पाडताना अक्षम्य निष्काळजीपणा दाखविला आहे. यावरुन मे. गौतम मार्केटिंग यांनी सादर केलेले निवेदन हे मोघम स्वरुपाचे व या कार्यालयाची दिशाभूल करणारे आहे. वरिष्ठ पोलिस निरीक्षक, एपीएमसी पोलिस ठाणे यांनी सादर केलेला तपासाचा अहवाल तसेच अनुज्ञप्ती प्राधिकारी तथा उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे यांनी सादर केलेल्या अहवालाचे अवलोकन करता मे. गौतम मार्केटिंग यांचा घटनास्थळी सुरु असलेला खाद्यतेलाचा व्यवसाय हा विनापरवाना असल्याचे निष्पन्न होत आहे.

मे. गौतम मार्केटिंगचे मालक यांच्या गैरकृत्यांमुळे त्यांनी खाद्यतेलाचे घाऊक परवानाधारक म्हणुन अनुज्ञप्ती प्राधिकारी तसेच पर्यायाने शासनाची विश्वासर्हता गमावल्याचे दिसुन येत आहे. मे. गौतम मार्केटिंगच्या वतीने सुनावणीच्यावेळी केलेल्या खुलाशांचे अवलोकन करता, त्यांनी भेसळयुक्त साठ्याबाबत काहीच भाष्य न करता अनपेक्षितरित्या केवळ या कार्यालयाच्या अथवा शासनाच्या वतीने करण्यात आलेल्या कायदेशीर कारवाईवर ताशेरे ओढले आहेत. सदर सुनावणीच्या प्रक्रियेमध्ये मे. गौतम मार्केटिंगच्या वतीने विविध कागदपत्रे उपलब्ध करुन देण्याच्या सबबी सांगुन अडथळा निर्माण केल्याने त्यांनी शासनाच्या बहुमुल्य वेळेचा अपव्यय केल्याचे दिसुन येत आहे.

मे. गौतम मार्केटिंग या ट्रेड नावाने त्यांचेकडे खाद्यतेलाचा घाऊक परवाना क्र. ४१/फ/वाशी/सं.प./७८१(घा.) असुन त्यांची वैधता दिनांक ३१.१२.२०१४ पर्यंत आहे. त्याअनुषंगाने महाराष्ट्र अनुसुचित वस्तु घाऊक व्यापार अनुज्ञप्ती आदेश, १९९८ या आदेशामधील तसेच त्याअन्वये त्यांना देण्यात आलेल्या घाऊक परवानाच्या तरतुदींनुसार परवानाधारक म्हणुन त्यांनी साठा पुस्तक, खरेदी बिले, विक्री पुस्तक इ. दस्ताऐवज अद्यावत ठेवणे गरजेचे असुन सदरचा संपुर्ण अभिलेख तपासणी पथकास उपलब्ध करुन देणे बंधनकारक आहे. तथापी, प्रत्यक्षात तपासणीचे वेळी घटनास्थळी सदरचा महत्वपूर्ण संपूर्ण अभिलेख साठा मालक यांनी सादर केला नाही. मे. गौतम मार्केटिंग या नांवे खाद्यतेलाचा घाऊक व्यवसाय करीत असताना साठा मालक म्हणुन ते करीत असलेल्या व्यवसायात व त्या अनुषंगाने आवश्यक अभिलेखात पारदर्शकता आणणे गरजेचे आहे. परंतु तपासणीचे वेळी पथकास या महत्वपूर्ण बाबींचा अभाव असल्याचे सिध्द झाले आहे. प्रचलित नियमानुसार व्यवसाय करीत असतांना परवानाधारकास साठा खरेदी करतांना पुरवठादाराकडून खरेदी बिले प्राप्त करणे त्या अनुषंगाने साठा पुस्तकात नोंदी घेणे तसेच ते पॅकिंग करीत असलेल्या विविध प्रकारच्या खाद्यतेलाची प्रत्यक्षात उपभोक्त्यास विक्री करीत असतांना

त्यांनी केलेल्या प्रत्येक विक्री व्यवहाराची बिले तयार करुन त्याचवेळेस उपभोक्त्यास देणे बंधनकारक आहे. सबब, साठा मालक यांनी घटनास्थळी विक्री पुस्तक अथवा विक्री बिलांचा कोणताही तपशिल/अभिलेख सादर केला नसल्याने ते विना विक्री बिलांची अवैध विक्री करीत असल्याने त्यांचा संपूर्णत: अवैध व्यवसाय असल्याचे निष्पन्न होत आहे. सदर गैरकृत्यामुळे मे. गौतम मार्केटिंगचे मालक यांनी परवानाधारक म्हणुन शासनाची विश्वासार्हता गमावली आहेच याशिवाय त्यांनी सदरचा अवैध व्यवसाय कार्यरत ठेवून इतर संबंधित शासकिय विभागांचीही दिशाभुल केली असल्याचे सकृतदर्शनी दिसुन येते.

उपरोक्त गुन्हा नोंद प्रकरणी मे. गौतम मार्केटिंग यांचा नमूद गोदामात तपासणीच्या वेळी पथकास घटनास्थळी नमूद कंपनीचे मालक हे त्यांच्या गोदामात पामतेल अथवा इतर कमी प्रतीचे खाद्यतेल हे विविध क्षमतेच्या डब्यांमध्ये पॅकिंग करुन त्या डब्यांवर शेंगदाणा तेल, राईचे तेल, कपाशीचे तेल अशी लेबले लावून त्यामधील खाद्यतेलाचा साठा हा उच्च प्रतीचा असल्याचे भासवून भेसळयुक्त खाद्यतेलाच्या साठ्याची विक्री करुन ग्राहकांची फसवणूक करीत असल्याचे सकृतदर्शनी दिसून आले. तसेच सदर प्रकरणी या कार्यालयास प्राप्त झालेल्या खात्रीलायक बातमीमध्येही मे. गौतम मार्केटिंगचे मालक हे वरील नमूद धोकादायक पध्दतीचा अवलंब करुन भेसळयुक्त साठ्यांचा व्यवसाय कार्यरत ठेऊन जनसामान्यांच्या जिवीतास धोका निर्माण करीत असल्याची बाब प्रकर्षाने नमूद करावीशी वाटते. मे. गौतम मार्केटिंगचे मालक विशाल अमरशी गाला यांनी भेसळयुक्त साठ्याचा व्यवसाय करुन गोरगरीब जनतेच्या तथा उपभोक्त्यांच्या जीवीतास धोका निर्माण केल्याने ते गंभीर सामाजिक अपराधाच्या शिक्षेसही पात्र आहेत. सबब, मे. गौतम मार्केटिंगचे मालक विशाल अमरशी गाला हे भेसळयुक्त खाद्यतेलाच्या साठ्याचा अवैध व्यवसाय करीत असल्याचे सिध्द झाल्याने, त्यांचे विरुध्द फुड सेफटी ॲण्ड स्टॅंडर्डस ॲक्ट, २००६ अंतर्गत कारवाई करण्याकरीता आयुक्त, अन्न व औषध प्रशासन विभाग, बांद्रा, मुंबई यांचेकडे प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. सदर प्रकरणी जप्त मुद्देमालाच्या प्राप्त पृथ:करण अहवालावरुन मे. गौतम मार्केटिंगचे मालक यांनी घटनास्थळी बहुतांश प्रमाणात पामतेलाचा साठा खरेदी करुन त्यामध्ये भेसळ करुन सदरचा साठा हा विविध प्रकारच्या खाद्यतेलाच्या ब्रँडमधील डब्यांमध्ये पॅकींग करुन तो भेसळयुक्त साठा हा उच्चप्रतीचा असल्याचे भासवुन जनसामान्यांच्या जीवीतास धोका निर्माण करुन शासनाची तसेच पर्यायाने उपभोक्त्यांची घोर फसवणूक केली असल्याचे सिध्द होत आहे. सदर नमुन्यांचा जप्त खाद्यतेलाचा साठा हा भेसळयुक्त असल्याने तो मानवीय खाण्यास अयोग्य अथवा मानवीय जिवीतास धोका निर्माण करणारा असल्याचे निष्पन्न होत आहे. सबब, मे. गौतम

मार्केटिंग यांचा घटनास्थळी जप्त करण्यात आलेल्या खाद्यतेलाच्या साठ्याबाबत या कार्यालयाने दिनांक २६/०२/२०१३ रोजी पारित केलेले अंतरिम आदेश कायम करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

सबब, उपरोक्त विवेचन विचारात घेऊन मी, नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई, मला जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ६-अ नुसार प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये एपीएमसी पोलीस ठाणे, नवी मुंबई येथे गुन्हा नोंद क्र. ३००३/२०१३, दिनांक १२/०१/२०१३ मध्ये जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालासंदर्भात खालील आदेश देत आहे.

**<u>आदेश</u> :-**

१) या कार्यालयाचे दिनांक २६/०२/२०१३ रोजीचे अंतरिम आदेश या आदेशान्वये कायम करण्यात येत आहेत.

२) प्रस्तुत गुन्हा नोंद प्रकरणी जप्त करण्यात आलेला विविध खाद्यतेलाच्या साठ्यापैकी भेसळयुक्त सिध्द झालेला शेंगदाणा तेल, सोयाबीन तेल, राईचे तेल व कपासी तेलाचा सुटा अथवा पॅकबंद डब्यांमधील साठा हा शासनजमा करण्यात यावा.

३) उक्त शासनजमा करण्यात आलेला विविध खाद्यतेलाचा भेसळयुक्त साठा हा पोलिसांनी उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे (दुरध्वनी क्र. ०२२-२५३३२६५७) यांचे मदतीने मानवीय खाण्याव्यतिरिक्त इतर व्यवसायात वापरण्यासाठी प्रचलित दराने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी.

४) प्रस्तुत गुन्हा नोंद प्रकरणी जप्त करण्यात आलेला विविध खाद्यतेलाचा भेसळयुक्त नसलेला सुटा अथवा पॅकबंद डब्यांमधील साठा हा शासनजमा करण्यात यावा.

५) उक्त शासनजमा करण्यात आलेला विविध खाद्यतेलाचा भेसळयुक्त नसलेला साठा हा पोलिसांनी उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे (दुरध्वनी क्र. ०२२-२५३३२६५७) यांचे मदतीने वैध परवानाधारकास प्रचलित दराने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी.

६) प्रस्तुत प्रकरणी, जप्त करण्यात आलेले १५ किलो क्षमतेचे १३४७ रिकामे पत्र्याचे डबे व ५ लिटर क्षमतेचे ५६३८ रिकामे प्लास्टिकचे डबे, १५ लिटर क्षमतेचे १६० रिकामे प्लास्टिकचे डबे, १ लिटर क्षमतेचे २४०० रिकाम्या प्लास्टिकच्या बाटल्या हे किरकोळीने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी.



DIRECTOR OF CIVIL SUPPLIES

७) प्रस्तुत प्रकरणी, जप्त करण्यात आलेले लोखंडी टाक्या ७ नग, पाऊच मशिन १ नग, हॉरीझॉन एअर कॉम्प्रेसर-१ नग, फिलिप्स कंपनीचे फिलिंग मशिन-१ नग, जैनसन कंपनीचे सिलिंग मशिन-१ नग, सिटेक कंपनीचा वजन काटा-१ नग व इलेक्ट्रीक मोटार- १ नग हे साठा मालकाचे उदरनिर्वाहाचे साधन असल्याने बंधपत्र घेऊन त्यांना परत करण्यात यावेत.

वरीलप्रमाणे जप्त मुद्देमालाची पोलिसांनी विल्हेवाट लावून येणारी रक्कम पोलीसांनी वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई (Financial Advisor & Dy. Secretary, Food, Civil Supply & Consumer Protection Dept., Govt. of Maharashtra, Mumbai) यांचे कार्यालयाच्या वैयक्तिक ठेव लेख्यात "४४०८" या लेखाशिर्षात जमा करावी.

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

प्रति,

मे. गौतम मार्केटींगचे मालक विशाल अमरशी गाला
(वरिष्ठ पोलीस निरीक्षक, ए.पी.एम.सी. पोलिस ठाणे, नवी मुंबई यांचे मार्फत)

प्रत,

१) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, ए.पी.एम.सी. पोलिस ठाणे, नवी मुंबई यांना कळविण्यात येते की, सदरचे आदेश संबंधीतांवर बजावून त्याची दिनांकित पोच या कार्यालयास तात्काळ सादर करावी. तसेच आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करुन पूर्तता अहवाल सात दिवसात या कार्यालयास सादर करावा.

२) उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

३) वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, बंगाली गर्ल्स हायस्कूल, चर्चगेट, मुंबई यांना माहितीसाठी अग्रेषित.

४) कार्यासन अधिकारी, दक्षता शाखा, कार्यक्र. ५ प्रधान कार्यालय, मुंबई यांना माहितीस्तव.

५) निवड नस्ती.

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.